महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

==========================================================================

जा.क्र.तशिविकापू/विवि/संस्थाबदल २०२०-२१/ 2428 दिनांक :- 03 SEP 2020

**परिपत्रक :-**

संचालक/प्राचार्य,
खाजगी विनाअनुदानित,
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/एच.एम.सी.टी
पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था पुणे विभाग, पुणे

विषय: शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम/पाळीबदल, तसेच पहिल्या, दुस-या व तिस-या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत...

संदर्भ : १) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम,२०१५
२) मा.संचालक, तंत्रशिक्षण सचालनालय,म.रा.मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र २/एनजीसी/वि.स.ब/५३६ दिनांक २७/०७/२०२०
३) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र २/एनजीसी/वि.स.ब/५३७ दिनांक २७/०७/२०२०
४) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र २/एनजीसी/वि.स.ब/६३४ दिनांक ०२/०९/२०२०

उपरोक्त विषयास अनुसरुन प्राप्त संदर्भ क्र ४ च्या परिपत्रकाची व सहपरिपत्रकाची छायाप्रत सोबत जोडलेली आहे. त्या अनुषगाने सर्व संस्थाना कळिवण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रकामध्ये दिलेल्या निदेशानुसार अंतर्गत शाखा बदलाची तसेच संस्था बदल/शाखा बदलासह संस्था बदल व विद्यापिठा बाहेरील संस्थाबदल, या बाबतच्या प्रस्तावाची कार्यवाही करावी.

विद्यार्थी संस्था बदल/शाखा बदलाच्या अनुषंगाने खालील सूचनांचे सहसंचालक,तंत्र शिक्षण,विभागीय कार्यालये/संबंधित संस्था/विद्यार्थी यांनी काटेकोर पालन करावे. ब-याच विद्यापीठांचा निकाल जाहीर झाला नसल्याने संस्था बदलासाठी अर्ज करण्यास मदतवाढ देण्यासाठी विद्यार्थ्यांकडून विनंती करण्यात येत होती. कोविड १९ या आजाराच्या अनुषंगाने असलेली टाळेबंदी, विद्यापिठांचा निकाल जाहीर न होणे इ.कारणे विचारात घेऊन विद्यार्थ्यांना संस्था व पाठयक्रम बदलास अर्ज करण्यासाठीच्या सुधारीत दि १५/०९/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

सोबत :- मा.संचालक, तं.शि.म.रा यांचा सुधारीत आदेश छायांकित प्रत

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३, ४५०
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२०/८३८ दिनांक : 02 SEP 2020

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

२) प्राचार्य,सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,
वास्तुशास्त्र,एचएमसीटी इ. पदवी महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम / पाळी बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ : १) या संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/वि.सं.ब/२०२०/५३७, दि. २७.०७.२०२०
२) या संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/वि.सं.ब/२०२०/५८६, दि. १७.०८.२०२०

विषयांकित संदर्भीय पत्र पहावे.

राज्यातील काही विद्यापीठांचा निकाल जाहीर झाला नसल्याने संस्था बदलासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यासाठी विद्यार्थ्यांकडून विनंती करण्यात येत होती. कोविड १९ या आजाराच्या अनुषंगाने असलेली टाळेबंदी, विद्यापीठांचा निकाल जाहीर न होणे इ. कारणे विचारात घेऊन विद्यार्थ्यांना संस्था व पाठ्यक्रम बदलास अर्ज करण्यासाठीच्या सुधारीत दि. १५.०९.२०२० निर्धारीत करण्यात आला आहे. यास्तव संदर्भीन पत्रासोबतचे प्रपत्र अधिक्रमीत करून सोबत जोडलेल्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार तीन स्तरावर मान्यता देण्याची कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी. सदर कार्यवाही करतांना सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये व संबंधित संस्थांचे प्राचार्य यांनी नियमांचे काटेकोर पालन करावे.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, माहितीसाठी सादर

१) मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर
२) मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)
३) कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई
४) कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.

प्रपत्र अ

| अ. क्र. | तपशील | कार्यवाही | कालमर्यादा | कार्यवाही प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | अ) संस्था अंतर्गत शाखा बदल /पाळी बदल | संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनेसार शाखा बदलाची कार्यवाही करावी | दि. १६/०९/२०२० किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांक यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | संबंधित संस्थेचे प्राचार्य |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल | प्राप्त विनंती अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारे विहित नमुन्यातील अर्जावर आवश्यक ती माहिती भरून आवश्यक दस्तावेजासह त्यांचेकडील रिक्त जागांची माहिती व ना-हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव अभ्यासक्रम निहाय सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह Email द्वारे पाठविण्यात यावेत. | दि.१६/०९/२०२० किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या ३ दिवस अगोदर यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | संस्था बदलीने प्रवेश देणा-या संस्थेचे प्राचार्य |
| २ | इ) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विद्यापीठांतर्गत) | विना अनुदानित संस्थाकडून संस्था बदलाबाबत विद्यापीठा अंतर्गत प्राप्त अर्जाच्या (१--ब नुसार) अनुषंगाने सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात असणा-या संस्था बदलाचे प्रकरणी मान्यतेची कार्यवाही करावी | दि.२१/०९/२०२० किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांक यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विद्यापीठ बदल) | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे १-ब नुसार प्राप्त होणा-या विद्यापीठाबाहेरील प्रस्तावांची दि. २४.०४.२०१७ च्या शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील तरतदूीनुसार छाननी / तपासणी करून सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह मान्यतेसाठी एकत्रित प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालनालयास ईमेल द्वारे पाठविण्यात यावेत. | दि.१७/०९/२०२० किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या ३ दिवस अगोदर यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |
| ३ | संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विद्यापीठ बदल) | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे २-ब नुसार प्राप्त होणा-या अर्जावर तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत मान्यतेची कार्यवाही करण्यात येईल. | दि.२१/०९/२०२० किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांक यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | संचालक, तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई |